Registered - R.N.I. No.: MAHMAR/2008/26837 • Postal Regd. No.: MCN/110/2015-2017 • Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office, GPO, Mumbai on 12th & 13th of every month.

डिसेंबर २०१७

खंड १०, अंक १२

किंमत रु. २/-

वाईजइन्व्हेस्ट ॲडव्हायझर्स प्रायव्हेट लिमिटेड यांचे मासिक

# वेल्थवाईज®

Wiseinvest®
With YOU, in meeting
FINANCIAL CHALLENGES

## आतील बाजूस — पान क्र.


अव्यवस्थितपणाचा तुम्हाला मोठा फटका बसू शकतो — २

निवडक फंडचा परिणाम — ३

वेळ आली आहे, वित्तीय नियोजनाची कास धरण्याची — ४


## "वाईजइन्व्हेस्ट"

"वेल्थवाईज" हे वाईजइन्व्हेस्ट ॲडव्हायझर्स चे मासिक प्रकाशन आहे. वाईजइन्व्हेस्ट ॲडव्हायझर्स म्युच्युअल फंडस् चा विशेष व्यासंग असलेली उत्तम सल्लागार कंपनी आहे. जरी म्युच्युअल फंडस् हा पैसा गुंतवण्याचा सोपा मार्ग असला तरी व्यावसायिक सल्ला मिळाला तरच तुम्हाला सर्वोत्तम प्राप्ती होईल. आमचे सीईओ श्री. हेमंत रूस्तगी हे सुप्रसिध्द पर्सनल फायनान्स तज्ञ आहेत. त्यांच्याकडे म्युच्युअल फंड उद्योग क्षेत्रातला २५ वर्षांपेक्षा अधिक अनुभव आहे. ते नियमितपणे मुख्य राष्ट्रीय दैनिकांतून आणि व्यापारविषयक मासिकांतून लेख लिहितात त्याचप्रमाणे गुंतवणुकीशी संबंधित दूरदर्शनवरच्या अनेक कार्यक्रमांतून पर्सनल फायनान्स तज्ञ म्हणून उपस्थित असतात. त्या खेरीज, म्युच्युअल फंड उद्योगात अनेक वर्षे व्यतीत केलेल्या व्यावसायिकांचा समावेश आमच्या सल्लागारांच्या फळीत आहे. गेल्या तेरा वर्षांत आमच्या हजारो ग्राहकांना आमच्या उत्तम सल्ल्याचा लाभ झालेला आहे आणि त्यांनी त्यांच्या पोर्टफोलिओचा म्युच्युअल फंडस् हा मुख्य आधार बनवलेला आहे. तुमच्या सध्याच्या तसेच नवीन गुंतवणुकीसाठी तुम्हाला सुध्दा आमच्या तज्ञ मार्गदर्शनाचा लाभ होऊ शकतो. तुम्हाला फक्त आमच्या कोणत्याही शाखेला फोन करणे अथवा information@wiseinvestadvisors.com या संकेतस्थळावर तुमचे तपशील ई–मेल करणे एवढेच करायचे आहे आणि आमचे व्यावसायिक सल्लागार उरलेले सर्व काही करतील.



प्रिय गुंतवणूकदार,

सेन्सेक्स ४५३ पॉइंट्सनी घसरला - ही त्याची वर्षभरातील एका सत्रातील सर्वांत मोठी घसरण होती - महिन्याच्या अखेरच्या दिवशी, कारण गुंतवणूकदारांनी एफअँडओ एक्सपायरी, कोरियासंबंधित प्रश्न, कमी महसूल वसुली आणि खर्चामधील वाढीमुळे वित्तीय तुटीसंदर्भातील वाढत जाणारी चिंता तसेच मूल्यांकनाचे प्रश्न अशा महत्त्वाच्या घटनांच्या पार्श्वभूमीवर सावध भूमिका घेतली. परंतु, बाजाराच्या कामकाजाच्या तासांनंतर घोषित करण्यात आलेल्या जीडीपीच्या आकड्यांमुळे असे दिसून आले की भारताची अर्थव्यवस्था सप्टेंबरच्या तिमाहीमध्ये ६.३% नी वाढली, ज्यातून असे स्पष्टपणे निदर्शनास येते की गेल्या वर्षीच्या चलनबंदीच्या आणि १ जुलैला जीएसटी अंमलात आल्याच्या काही नकारात्मक परिणामांमध्ये लक्षणीयरीत्या सुधारणा झालेली आहे. भारतीय अर्थव्यवस्था पाच तिमाहींमध्ये प्रथमच वृद्धिंगत झालेली आहे. ती जूनच्या तिमाहीत तीन वर्षांतील सर्वांत कमी पातळीवर म्हणजेच ५.७% वर आली होती. यामुळे पुढील काही सत्रांमध्ये शेअर बाजारास परत बळ येण्यास मदत व्हायला हवी.

अर्थव्यवस्थेला मूडीज्च्या गुंतवणूकदार सेवांकडून सकारात्मक पाठबळ मिळाले कारण त्यांनी भारताला २००४ नंतर प्रथमच बीएए२ वरून बीएए३ चे स्थान दिले. या मूल्यांकन संस्थेला असा विश्वास आहे की मोदी शासनाद्वारे अंमलात आणल्या जाणाऱ्या सुधारणांमुळे वाढत जाणारी ऋण पातळी स्थिर करण्यास मदत होईल. या अद्यतनामुळे भारतीय शासनाच्या आणि कंपन्यांच्या उसनवारीच्या खर्चात घट होईल. रुपया, बाँड्स आणि शेअर या अद्यतनानंतर वधारले.

परंतु, एस अँड पी या दुसऱ्या जागतिक मूल्यांकन संस्थेने तिचे भारताबद्दलचे मूल्यांकन न बदलता एका स्थिर दृष्टिकोनातून बीबीबी या सर्वांत खालच्या गुंतवणूक श्रेणीमध्ये ठेवले, व त्यासाठी लक्षणीय वित्तीय तूट, उच्च सर्वसाधारण शासकीय कर्ज आणि कमी दरडोई उत्पन्न ही कारणे दिली. परंतु, या संस्थेला असे वाटते की भारताची वृद्धि सशक्तपणे होत राहील आणि वित्तीय तूट पातळी विस्तृतपणे अपेक्षेनुसारच राहील. एस अँड पी यांनी याआधी भारताचे सार्वभौम मूल्यांकन जानेवारी २००७ मध्ये बीबी+ वरून बीबीबी- वर अद्ययावत केले होते.

महागाईच्या आघाडीवर, भारताची किरकोळ क्षेत्रातील महागाई ऑक्टोबरमध्ये ३.५८% नी वाढली, जी सात महिन्यांमधील सर्वाधिक गती होती, व यास अन्नपदार्थ व इंधनाच्या किंमतीमुळे चालना मिळाली. घाऊक क्षेत्रातील महागाईसुद्धा एका महिन्यापूर्वीच्या २.६% वरून सहा महिन्यांतील ३.५९% या सर्वाधिक पातळीवर आली. सध्याची परिस्थिती वस्तुत: आरबीआयद्वारे तिच्या ६ डिसेंबरच्या चलनविषयक धोरणामध्ये कोणतीही व्याजकपात होण्याची शक्यता नाकारते.

आम्हाला असा विश्वास आहे की शेअर बाजार काही काळ सध्याच्या पातळीच्या जवळपासच राहील.परंतु, सकारात्मक बाब ही आहे, की काही काळ नीट कामगिरी करत नसलेली काही क्षेत्रे गेल्या दोन महिन्यांमध्ये मोठ्या हुशारीने परत उभारून येत आहेत. हा विस्तार शेअर बाजारासाठी चांगला आहे आणि यामुळे भविष्यात टिकाऊ स्वरूपाची तेजी येईल.

सस्नेह,

हेमंत रुस्तगी
संपादक

Address to be affixed here

## नोव्हेंबर २०१७ मधील शेअर बाजारातील परिणाम

| निर्देशांक | ०१ नोव्हेंबर २०१७ | ३० नोव्हेंबर २०१७ | बदल (%) |
|---|---|---|---|
| सेन्सेक्स | ३३,६००.२७ | ३३,१४९.३५ | -१.३४ |
| मिडकॅप | १६,६४६.६१ | १६,९१७.४४ | १.६३ |
| स्मॉल कॅप | १७,६९७.१८ | १८,२२८.८७ | ३.०० |
| बी एस ई-१०० | १०,८७८.६३ | १०,७०५.४३ | -१.५९ |
| बी एस ई-२०० | ४,५८१.१० | ४,५२७.४४ | -१.१७ |
| बी एस ई-५०० | १४,६०८.९३ | १४,४९३.५८ | -०.७९ |




Enjoy progress even during market uncertainties.

Overcome market volatility by investing with SIP.

INVEST WITH THE EXPERTS
INVEST WITH KOTAK SIP

kotak Mutual Fund

SIP is a Systematic Investment Plan (SIP) that allows you to periodically invest a fixed amount over a defined period of time. With SIP, you benefit from Rupee Cost Averaging, which means you buy more units when the markets are down and lesser units when markets are high. This helps you to ride through the market volatility smoothly. Thus, making your investment more efficient. So, invest with Kotak SIP today and reap the benefits of investing with the experts.

Call: 1800222626 l assetmanagement.kotak.com

Mutual fund investments are subject to market risks, read all scheme related documents carefully.

Connect with us on

# अव्यवस्थितपणाचा तुम्हाला मोठा फटका बसू शकतो

आपल्या आयुष्यातील महत्त्वाच्या वळणांवर आपल्याकडे पुरेसे आर्थिक स्रोत उपलब्ध असण्याची खात्री करण्यासाठी अधिकाधिक संख्येने गुंतवणूकदार योग्य गुंतवणूक धोरणाचा अवलंब करीत आहेत ही आनंदाची बाब आहे. तथापि आपल्या गुंतवणुकीचे नियोजन करण्याची आवश्यकता न वाटणारे असे अनेक गुंतवणूकदार अजूनही मोठ्या संख्येने आहेत. त्यातील काही जण फारच हात आखडून अति सावधपणे आपले भांडवल संरक्षित राहीलच अशी गुंतवणूक करतात तर इतर असेही आहेत की झटपट विनासायास लाभ कमावण्यासाठी आक्रमकपणे पैसा गुंतवतात.

ह्या दोन्ही प्रकारच्या दृष्टिकोनांमुळे गुंतवणूकदारांना वेगळ्या प्रकारच्या जोखमींना तोंड द्यावे लागतं हे वेगळं सांगायला नको. अति सावध गुंतवणूकदारांना अखेरीस त्यांच्या दीर्घकालीन उद्दिष्टांशी तडजोड करावी लागते तर आक्रमक गुंतवणूकदार पैशाचा पाऊस पडेल ह्या फसव्या आशेने अवाजवी गुंतवणूक निर्णय घेतात.

म्हणूनच जोखीम आणि मोबदला ह्यामध्ये योग्य संतुलन साधेल असे गुंतवणूक धोरण अवलंबिणे आणि जे करकार्यक्षम आहेत, लवचिक आणि पारदर्शक आहेत तसेच व्यावसायिक निधी व्यवस्थापनाचा लाभ देतात असे गुंतवणूक पर्याय स्वीकारणे ही खरी कळीची गोष्ट आहे. आपल्या सुनिश्चित जोखीम क्षमतेमध्ये गुंतवणूक जोखीम राहील ह्याची काळजी घेणारा एक धोरणव्यूह म्हणजे मालमत्ता नियतन करण्याचा होय. हे मालमत्ता नियतन आपल्या कालक्षितिजावर, उद्दिष्टांवर आणि जोखीम स्वीकारण्याच्या क्षमतेवर आधारित असते. ज्यावेळी योग्य गुंतवणूक पर्याय निवडण्याची वेळ येते त्यावेळी म्युच्युअल फंड बहुतेक परिमाणांच्या बाबतीत इतर पर्यायांवर मात करताना दिसतात. अर्थातच योग्य फंडांची निवड करणे आणि त्यांच्या कामगिरीवर सतत लक्ष ठेवणे महत्त्वाचे असते.

आजच्या गुंतागुंतीच्या वित्तीय वातावरणात, योग्य विचाराने पैसे गुंतविणे आधिकाधिक आव्हानात्मक होत चालले आहे. येथेच वित्तीय नियोजनाची भूमिका महत्त्वाची ठरू शकते. वित्तीय नियोजन केलेले असल्यास आणि ते अंमलात आणण्यासाठी एखादा धोरणव्यूह असल्यास गुंतवणूकदाराला त्याच्या विविध गरजांसाठी आणि आवश्यकतांसाठी योग्य रकमा नियत करता येतात.

दुसऱ्या शब्दांमध्ये सांगायचं तर वित्तीय नियोजनाची मदत माहितीपूर्ण निधी व्यवस्थापन निर्णय घेऊन आर्थिक भविष्यकाळ सुरक्षित करण्यासाठी होते. वित्तीय नियोजनात बचतीचे नियतन विविध मालमत्ता वर्गांमध्ये सुयोग्य जोखीम-लाभ संतुलन साधण्याच्या उद्देशाने केलेले असते.

वित्तीय नियोजन करण्यासाठी काही प्राथमिक आवश्यक गोष्टी असतात उदाहरणार्थ, निश्चित राश्यात्मक उद्दिष्टे ठरविणे, जोखीम व्यवस्थापनाचा अंगिकार करणे, प्रत्येक आर्थिक निर्णयाचा परिणाम समजून घेणे आणि अपेक्षांच्या बाबतीत वास्तव दृष्टिकोन बाळगणे.

## उद्दिष्टे निश्चित करणे

अल्प, मध्यम आणि दीर्घकालीन उद्दिष्टे निश्चित करणे महत्त्वाचे आहे कारण त्यामुळे ती साध्य करण्यासाठी संपूर्ण प्रयत्नांची दिशा निश्चित करता येते. एकदा उद्दिष्टे सुस्थापित असली की ह्यातील प्रत्येक उद्दिष्ट साध्य करण्यासाठी आपण एक कालक्षितिज ठरवायला हवे आणि त्यांचे आकारमान निश्चित करायला हवे. थोडक्यात सांगायचं तर ह्या प्रत्येक उद्दिष्टासाठी लक्ष्य ठरवून प्रस्तावित मालमत्ता नियतनाच्या आधारे अपेक्षित उत्पन्नाचा दर निश्चित करायला हवा म्हणजे ही उद्दिष्टे साध्य करण्यासाठी किती रक्कम गुंतवावी लागेल ह्याचे गणित आपण करू शकू.

गुंतवणूक प्रक्रिया लवकर आणि योग्य प्रकारे सुरू करणे महत्त्वाचे असले तरी तिच्या प्रगतीकडे लक्ष ठेवणेही तितकेच महत्त्वाचे आहे. म्हणून ह्यापैकी प्रत्येक उद्दिष्टासाठी आपण एक स्वतंत्र निवेशसंच तयार केला तर सोयीचे होते. ह्यामुळे सर्व उद्दिष्टांवर आणि ती साध्य करण्याच्या प्रगतीवर सर्वकाळ पूर्ण नियंत्रण राहते.

## जोखीम व्यवस्थापनाकडे दुर्लक्ष करू नका

अनेक गुंतवणूकदार त्यांच्या गुंतवणूक प्रक्रियेचे व्यवस्थित पालन करीत असले तरी अनेकदा एका गोष्टीकडे त्यांचे दुर्लक्ष होते. ही गोष्ट म्हणजे जोखीम व्यवस्थापन होय. हे फारच धोकादायक असू शकते कारण आपले आयुष्य, आरोग्य आणि मालमत्ता ह्यांच्या बाबतीतल्या जोखिमा संरक्षित करणे महत्त्वाचे असते. म्हणूनच गुंतवणूक प्रक्रिया सुरू करण्यापूर्वी ह्या जोखिमा पुरेशा प्रमाणात संरक्षित असल्याची खात्री आपण करायला हवी. ध्यानात असू द्या, योग्य विमा पॉलिसी खरेदी करणे तितकेच महत्त्वाचे आहे.

पारंपारिक विमा पॉलिसीसाठी जास्त प्रिमियम तर भरावा लागतोच शिवाय जोखीम संरक्षणाच्या राशीवर आणि गुंतवणुकीवरील तडजोडीबाबतही तडजोड करावी लागते. मुदतीची विमा योजना पारंपारिक आणि युनिट संलग्न अशा दोन्ही प्रकारांपेक्षा विमा संरक्षणाचे आकारमान तसे खर्च ह्या दोन्ही बाबतीत सरस ठरते. म्हणून विम्याच्या गरजा आणि गुंतवणुकीच्या गरजा नेहमी वेगवेगळ्या राखणे श्रेयस्कर असते.

आपल्या सहा महिन्यांच्या खर्चाइतका आपत्कालीन निधी तयार करणे हासुद्धा जोखीम व्यवस्थापनाचा एक महत्त्वाचा भाग आहे. जेव्हा आयुष्यात चढ उतार येतात तेव्हा गुंतवणूक प्रक्रियेत व्यत्यय येणार नाही ह्याची खात्री हा फंड करतो. जोखीम आणखी कमी करण्यासाठी जोखीम व्यवस्थापन प्रक्रियेचा पद्धतशीर आणि नियमित आढावा घेणे महत्त्वाचे आहे.

## मालमत्ता नियतनाशी बांधीलकीचे पालन करा

उद्दिष्टांवर आधारित गुंतवणुकीमुळे आपण स्पष्ट कालक्षितिज समोर ठेवून गुंतवणूक करू आणि निवेशसंचात अचानक बदल करण्याचे टाळू ह्याची खात्री होण्यास मदत होते. मालमत्ता नियतन ही वित्तीय नियोजनाचा एक भाग असून त्यामुळे बव्हंशी जोखीम पातळी आणि निवेशसंचापासून मिळणारे संभाव्य उत्पन्न ठरत असते.

जोखीम कमी समजण्याची आणि/किंवा लाभ जास्त मिळतील असे समजण्याची चूक करू नका. गुंतवणुकीच्या ह्या गोष्टीबद्दल आपण काळजी घ्यायला हवी. प्रत्येक गुंतवणूक पर्यायाशी निगडित जोखमीचा अंदाज करून आपण मोठी संपत्ती उभारण्याची शक्यता वाढवू शकतो.

## तुमच्या नातेवाईक आणि मित्रांसाठी ‘वेल्थवाईज’

**तुमचे मित्र, नातेवाईक किंवा सहकारी यांना वेल्थवाईज विनामूल्य प्राप्त व्हावे असे तुम्हांला वाटत असेल तर, तुम्ही संपूर्ण तपशील म्हणजेच पूर्ण नाव, टपाली पत्ता आणि दूरध्वनी क्रमांक, आम्हाला पाठवू शकता. हा तपशील इ-मेल किंवा पत्राद्वारे किंवा आमच्या कोणत्याही शाखेला भेट देऊन पुरवू शकता. तुम्ही जास्तीत जास्त दोन व्यक्तिंचे नामनिर्देशन करू शकता. लक्षात ठेवा, वेल्थवाईज वाचणे ही कोणासाठीही चांगला जाणता गुंतवणूकदार होण्याची आणि म्युच्युअल फंडातील आपल्या गुंतवणूकीतून उत्तम ते प्राप्त करण्याची पहिली पायरी आहे. तेव्हा, कोणाला तरी नामनिर्देशित करा आणि त्यांचे आयुष्य बदलण्यात वेल्थवाईज बरोबर चालना देणारी शक्ती व्हा.**

**तुम्ही तुमचा मित्र, नातेवाईक किंवा सहकारीचे पूर्ण नाव, टपाली पत्ता आणि दूरध्वनी क्रमांक,** information@wiseinvestadvisors.com **वर इ-मेल करू शकता किंवा ६५२८१५०७ / २६७३२६७६ (अंधेरी) आणि ६५९२७०५१ / २५३७१५६७ (ठाणे) वर फोन करू शकतात.**

# निवडक फंडचा परिणाम

## २४ नोव्हेंबर, २०१७ रोजी असलेल्या नोंदी

## EQUITY FUNDS

### Diversified

| Fund | Launch | 6 Mth* | 1 Year* | 2 Year** | 3 Year** | 5 Year** | 7 Year** | 10 Year** | 15 Year** |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| Birla Sun Life Frontline Equity Fund | Aug-02 | 12.24 | 30.59 | 17.81 | 11.14 | 18.53 | 13.11 | 11.73 | 23.39 |
| Birla Sun Life Equity Fund | Aug-98 | 13.46 | 31.54 | 22.71 | 15.72 | 22.57 | 13.90 | 10.30 | 25.52 |
| Canara Robeco Equity Diversified Fund | Sep-03 | 12.94 | 35.91 | 14.96 | 9.08 | 15.09 | 11.70 | 10.30 | — |
| Franklin India Prima Plus Fund | Sep-94 | 12.14 | 29.24 | 15.87 | 12.42 | 19.72 | 14.50 | 11.72 | 24.49 |
| HDFC Equity Fund | Jan-95 | 16.19 | 36.62 | 20.24 | 10.22 | 18.84 | 11.79 | 12.33 | 25.81 |
| HDFC Top 200 Fund | Sep-96 | 13.49 | 33.41 | 19.43 | 9.54 | 16.98 | 11.13 | 11.63 | 25.25 |
| HSBC Equity Fund | Dec-02 | 11.72 | 31.68 | 18.47 | 9.58 | 14.74 | 9.15 | 6.70 | — |
| ICICI Prudential Dynamic Plan | Oct-02 | 13.12 | 29.33 | 19.91 | 11.39 | 18.51 | 13.26 | 12.03 | 23.52 |
| ICICI Prudential Focused Bluechip | May-08 | 14.75 | 32.90 | 18.75 | 11.27 | 17.94 | 13.32 | — | — |
| Kotak 50 Regular Plan | Dec-98 | 10.32 | 28.52 | 14.37 | 10.00 | 16.18 | 10.73 | 7.98 | 22.03 |
| Kotak Select Focus Fund Regular Plan | Sep-09 | 12.03 | 34.25 | 20.61 | 14.65 | 21.88 | 14.85 | — | — |
| L&T Equity Fund | May-05 | 11.11 | 31.79 | 16.74 | 10.55 | 17.51 | 11.81 | 10.78 | — |
| Motilal Oswal MOSt Foc. Multicap 35 | Apr-14 | 14.52 | 38.70 | 22.92 | 21.17 | — | — | — | — |
| Reliance Top 200 Fund - Retail Plan | Aug-07 | 16.02 | 37.45 | 18.30 | 11.73 | 19.03 | 13.61 | 10.48 | — |
| Invesco India Contra Fund | Apr-07 | 19.00 | 42.35 | 22.38 | 15.72 | 22.56 | 15.31 | 13.79 | — |
| SBI Bluechip Fund | Feb-06 | 12.49 | 29.02 | 16.67 | 12.84 | 19.37 | 13.67 | 9.76 | — |
| UTI Opportunities Fund | Jul-05 | 11.99 | 28.01 | 13.57 | 6.18 | 13.58 | 10.97 | 10.32 | — |

### Sector, Specialty & Tax Saving

| Fund | Launch | 6 Mth* | 1 Year* | 2 Year** | 3 Year** | 5 Year** | 7 Year** | 10 Year** | 15 Year** |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| Canara Robeco FORCE Fund | Sep-09 | 13.76 | 37.40 | 20.20 | 14.21 | 18.85 | 14.05 | — | — |
| HSBC Tax Saver Equity Fund | Jan-07 | 13.35 | 40.85 | 20.82 | 13.40 | 19.39 | 13.41 | 11.03 | — |
| ICICI Prudential Infrastructure Fund | Aug-05 | 16.34 | 41.05 | 18.77 | 10.22 | 16.44 | 8.73 | 5.85 | — |
| Reliance Banking Fund | May-03 | 13.22 | 42.48 | 25.30 | 15.27 | 19.37 | 12.80 | 15.92 | — |
| Reliance Pharma Fund | Jun-04 | 13.07 | -2.70 | -3.42 | 3.37 | 15.82 | 13.54 | 18.46 | — |
| Axis Long Term Equity Fund | Dec-09 | 14.96 | 33.06 | 15.86 | 12.36 | 23.18 | 17.90 | — | — |
| HDFC Taxsaver Fund | Mar-96 | 15.66 | 36.34 | 20.68 | 10.73 | 19.28 | 12.23 | 11.10 | 25.80 |
| IDFC Tax Advantage (ELSS) Fund | Dec-08 | 20.96 | 49.10 | 23.31 | 16.91 | 22.06 | 15.21 | — | — |
| Reliance Tax Saver (ELSS) Fund | Sep-05 | 20.08 | 41.92 | 23.09 | 13.06 | 23.60 | 17.08 | 13.81 | — |

### Midcap & Smallcap

| Fund | Launch | 6 Mth* | 1 Year* | 2 Year** | 3 Year** | 5 Year** | 7 Year** | 10 Year** | 15 Year** |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| DSP BlackRock Small and Mid Cap | Nov-06 | 12.70 | 35.13 | 23.43 | 18.77 | 24.31 | 16.68 | 14.93 | — |
| Franklin India Smaller Companies Fund | Jan-06 | 16.53 | 38.24 | 24.09 | 19.99 | 30.73 | 21.51 | 15.59 | — |
| HDFC Mid-Cap Opportunities Fund | Jun-07 | 16.33 | 36.87 | 24.34 | 18.39 | 26.86 | 19.66 | 17.52 | — |
| IDFC Premier Equity Fund - Regular | Sep-05 | 14.14 | 33.34 | 15.09 | 13.04 | 20.19 | 15.46 | 15.17 | — |
| Motilal Oswal MOSt Foc. Midcap 30 | Feb-14 | 10.70 | 24.27 | 15.67 | 17.25 | — | — | — | — |
| Kotak Emerging Equity Scheme | Mar-07 | 15.81 | 38.06 | 24.03 | 19.90 | 25.75 | 17.38 | 10.84 | — |
| L&T India Value Fund | Jan-10 | 15.92 | 37.98 | 23.24 | 19.26 | 27.03 | 17.96 | — | — |
| Reliance Equity Opportunities Fund | Mar-05 | 17.91 | 36.63 | 14.01 | 8.83 | 17.91 | 14.22 | 12.84 | — |

## HYBRID

### Equity, Debt Oriented & Multi Asset Class

| Fund | Launch | 6 Mth* | 1 Year* | 2 Year** | 3 Year** | 5 Year** | 7 Year** | 10 Year** | 15 Year** |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| Birla Sun Life Balanced '95 Fund | Feb-95 | 11.49 | 24.62 | 17.14 | 12.51 | 18.16 | 13.18 | 12.63 | 20.73 |
| Canara Robeco Balance Fund | Feb-93 | 9.16 | 23.12 | 13.13 | 11.00 | 16.42 | 13.07 | 11.18 | 20.11 |
| DSP BlackRock Balanced Fund | May-99 | 9.57 | 23.31 | 16.34 | 12.66 | 16.42 | 11.64 | 11.02 | 20.14 |
| HDFC Balanced Fund | Sep-00 | 11.88 | 25.64 | 17.93 | 13.10 | 19.55 | 15.04 | 14.79 | 19.55 |
| HDFC Prudence Fund | Feb-94 | 12.92 | 26.93 | 18.46 | 11.43 | 18.31 | 13.32 | 13.38 | 23.40 |
| ICICI Prudential Balanced Advantage | Dec-06 | 8.44 | 18.39 | 12.46 | 10.42 | 14.97 | 13.06 | 10.46 | — |
| ICICI Prudential Balanced Fund | Nov-99 | 11.41 | 25.43 | 18.72 | 13.18 | 19.32 | 15.60 | 11.48 | 19.08 |
| Kotak Balance Regular Plan | Nov-99 | 7.33 | 20.70 | 15.73 | 10.32 | 13.84 | 10.31 | 8.15 | 18.12 |
| L&T India Prudence Fund | Jan-11 | 10.00 | 26.41 | 15.42 | 13.62 | 19.23 | — | — | — |
| Reliance Regular Savings Fund - Bal | Jun-05 | 13.84 | 29.76 | 16.82 | 12.74 | 17.45 | 12.86 | 13.48 | — |
| SBI Magnum Balanced Fund | Dec-95 | 15.43 | 23.62 | 14.81 | 12.45 | 18.34 | 13.17 | 10.24 | 21.23 |
| Tata Balanced Fund - Regular Plan | Oct-95 | 7.31 | 17.27 | 11.35 | 9.96 | 16.85 | 13.51 | 11.28 | 20.88 |
| Axis Triple Advantage Fund | Aug-10 | 6.92 | 12.08 | 10.53 | 7.09 | 7.71 | 8.23 | — | — |
| Kotak Equity Savings Fund | Oct-14 | 6.83 | 13.62 | 9.86 | 8.50 | — | — | — | — |

### Arbitrage Funds

| Funds | Launch | 3 Mth* | 6 Mth* | 1 Year* | 2 year** | 3 Year** | 5 Year** | 7 Year** | 10 Year** |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ICICI Prudential Equity Arbitrage Fund | Dec-06 | 1.41 | 2.82 | 5.58 | 6.20 | 6.70 | 7.75 | 8.08 | 7.45 |
| IDFC Arbitrage Plus Fund | Jun-08 | 1.26 | 2.69 | 4.07 | 6.06 | 6.38 | 7.17 | 7.36 | — |
| Kotak Equity Arbitrage Fund | Sep-05 | 1.48 | 3.03 | 5.83 | 6.29 | 6.75 | 7.67 | 7.91 | 7.50 |
| Invesco India Arbitrage Fund | Apr-07 | 1.43 | 2.75 | 5.60 | 6.01 | 6.62 | 7.16 | 7.53 | 7.11 |

## DEBT

### Income, Short Term & Ultra Short Term Funds

| Funds | Launch | 1 Mth* | 3 Mth* | 6 Mth* | 1 Year* | 2 Year** | 3 Year** | 5 Year** |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| Birla Sun Life Short Term Opp. Fund | May-03 | 0.15 | 0.99 | 3.67 | 4.45 | 8.71 | 8.74 | 9.51 |
| Birla Sun Life Dynamic Bond Fund | Sep-04 | -0.71 | -0.91 | 2.66 | -0.83 | 8.24 | 9.06 | 9.38 |
| Birla Sun Life Medium Term Plan | Mar-09 | 0.29 | 1.11 | 3.75 | 6.37 | 9.08 | 9.51 | 10.08 |
| HDFC Corporate Debt Opp. Fund | Mar-14 | 0.33 | 1.17 | 3.59 | 5.94 | 9.24 | 9.29 | — |
| Kotak Income Opp. Fund | May-10 | 0.38 | 1.27 | 3.33 | 5.89 | 8.89 | 8.95 | 9.06 |
| Invesco India Short Term Fund | Mar-07 | 0.15 | 0.89 | 3.05 | 4.07 | 7.36 | 7.57 | 7.71 |
| Invesco India Bank Debt Fund | Dec-12 | 0.22 | 0.87 | 2.65 | 4.40 | 6.24 | 6.56 | — |
| Reliance Regular Savings Fund-Debt | Jun-05 | 0.43 | 1.43 | 3.69 | 6.69 | 8.80 | 8.85 | 9.11 |
| SBI Magnum Income Fund | Nov-98 | 0.07 | 0.40 | 3.11 | 4.79 | 9.70 | 9.34 | 8.72 |
| L&T Income Opportunities Fund | Oct-09 | 0.29 | 1.25 | 3.62 | 6.74 | 8.72 | 9.11 | 8.89 |
| BNP Paribas Flexi Debt Fund | Sep-04 | -0.27 | -0.06 | 3.07 | 1.71 | 8.82 | 9.07 | 9.48 |
| BNP Paribas Money Plus Fund | Oct-05 | 0.44 | 1.42 | 3.35 | 6.17 | 7.35 | 7.59 | 8.10 |
| Kotak Treasury Advantage Fund | Aug-04 | 0.47 | 1.49 | 3.39 | 6.66 | 7.54 | 7.93 | 8.45 |
| L&T Ultra Short Term Fund | Apr-03 | 0.49 | 1.51 | 3.49 | 6.60 | 7.73 | 8.00 | 8.53 |
| Kotak Banking and PSU Debt Fund | Dec-98 | 0.17 | 0.90 | 3.45 | 5.57 | 8.37 | 8.50 | 9.00 |

*Absolute ** Annualised. Past performance may or may not be sustained in future.

### Dividends declared by equity and equity-oriented funds during the month of November 2017

| Scheme name | Date | Dividend declared in ₹ Per unit |
|---|---|---|
| ICICI Pru Balanced Fund (MD) | 01/11/2017 | 0.24 |
| Franklin India Oppor. (D) | 03/11/2017 | 1.75 |
| Franklin India TF - (D) | 03/11/2017 | 2.00 |
| Mirae Asset Prudence Fund - RP (D) | 06/11/2017 | 0.20 |
| Can Robeco India Opport. - RP-(D) | 06/11/2017 | 1.00 |
| JM Equity Fund (QD) | 06/11/2017 | 3.50 |
| Tata Equity P/E Fund (D) (TO-B 10%) | 07/11/2017 | 1.20 |
| ICICI Pru Dynamic Plan (D) | 08/11/2017 | 0.24 |
| DSP-BR Tax Saver Fund (D) | 10/11/2017 | 0.45 |
| Can Robeco Eqty TaxSaver (D) | 10/11/2017 | 1.00 |
| IDFC Imperial Equity - Regular (D) | 10/11/2017 | 2.00 |
| IDFC Balanced Fund - RP (D) | 13/11/2017 | 0.20 |
| L&T Tax Advantage (D) | 17/11/2017 | 1.20 |
| ICICI Pru MidCap Fund (D) | 17/11/2017 | 3.65 |
| ABSL Equity Fund (D) | 17/11/2017 | 10.30 |
| UTI Balanced Fund (D) | 20/11/2017 | 0.27 |
| UTI Nifty Index Fund (D) | 20/11/2017 | 0.35 |
| Invesco India Infrastructure (D) | 21/11/2017 | 1.85 |
| L&T India Prudence Fund (D) | 24/11/2017 | 0.13 |
| Reliance RSF - Balanced (D) | 24/11/2017 | 0.16 |
| Reliance Top 200 Fund-RP (D) | 24/11/2017 | 0.17 |
| L&T India Special Situations(D) | 24/11/2017 | 0.22 |
| Canara Robeco Large Cap+ (D) | 24/11/2017 | 1.35 |
| Can Robeco Emerg-Equities (D) | 24/11/2017 | 2.50 |
| ABSL Tax Relief 96 (D) | 24/11/2017 | 17.10 |
| Kotak Balance - Regular Plan (D) | 27/11/2017 | 0.14 |
| HDFC Prudence Fund (D) | 27/11/2017 | 0.30 |
| DSP-BR Balanced Fund (D) | 28/11/2017 | 0.21 |
| Kotak Opportunities Fund - Regular (D) | 28/11/2017 | 0.85 |
| SBI Magnum Global Fund (D) | 29/11/2017 | 5.10 |
| BNP Paribas Mid Cap Fund (D) | 30/11/2017 | 0.25 |
| Tata Balanced Fund - Regular (D) | 30/11/2017 | 0.46 |

Please check whether you have received dividend for the fund/s that you may have in your portfolio out of this list. In case, you do not maintain any portfolio statement, Wiseinvest Advisors can do that for you free of charge. Once we have the details, we would send your updated statement every month. You can contact our corporate office or our branch to avail of this free service.

Mutual funds, like securities investments, are subject to market and other risks. As with any investments in securities, the NAV of units can go up or down depending on the factors and forces affecting capital markets.

Registered - R.N.I. No.: MAHMAR/2008/26837 • Postal Regd. No.: MCN/110/2015-2017 • Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office, GPO, Mumbai on 12th & 13th of every month.
Date of publication: 8th of every month.

# वेळ आली आहे, वित्तीय नियोजनाची कास धरण्याची

वित्तीय नियोजन म्हणजे फायनान्शियल प्लॅनिंग, ही तुमचे भविष्य सुरक्षित करण्यासाठी पैशाचे माहितीयुक्त व्यवस्थापन करण्याची प्रक्रिया आहे. फायनान्शियल प्लॅनिंग उपलब्ध स्रोत, जबाबदाऱ्या, जोखीम क्षमता आणि जीवनशैली ह्याचा विचार करून वित्तीय उद्दिष्टे आणि वैयक्तिक प्राधान्यक्रम साध्य करण्यास मदत करते. जोखीम-लाभ संतुलन साधण्यासाठी वित्तीय योजनेत आपल्या बचतीचे नियतन विविध मालमत्तावर्गांमध्ये केले जाते.

## तुम्हाला वित्तीय योजनेची गरज आहे का?

सर्व व्यक्तींना आणि कुटुंबांना, त्यांचे उत्पन्न किंवा वय काहीही असले तरी एका वित्तीय नियोजनाची गरज असते. त्यामुळे निवृत्तीसाठी, महाविद्यालयीन शिक्षणासाठी किंवा नव्या घरासाठी आपण पुरेशी बचत करीत आहोत की नाही ह्याची जाणीव त्यांना होते. आपल्याला वित्तीय योजना आपल्या पैशाची बचत करण्यासाठी आवश्यक असलेली शिस्त देते. एखादा अर्हताप्राप्त आणि अनुभवी वित्तीय नियोजक तुम्हाला तुमच्या गुंतवणुकींचे नियोजन करण्यास मदत करू शकतो जेणेकरून तुम्ही तुमच्या गुंतवणुकी विभिन्न मालमत्ता वर्गांमध्ये तसेच गुंतवणूक पर्यायांमध्ये विभाजित करून तुमच्या जोखीम पातळीत सर्वोत्तम उत्पन्न मिळवू शकता.

वाईजइन्व्हेस्ट ॲडव्हायझर्स हे सेबी नोंदणीकृत गुंतवणूक सल्लागार आहेत (नोंदणी क्र. INA000000664). आमच्या सल्लासेवा आणि कार्यकारी सेवांमध्ये अंतर राखण्यासाठी आम्ही इन्व्हेस्टमेंट ॲडव्हायझर डिपार्टमेंट (IAD) ह्या नावाने स्वतंत्र विभाग स्थापन केलेला आहे.

आम्ही तुम्हाला तुमची उद्दिष्टे साध्य करण्यासाठी मदत करू शकतो. त्यासाठी आम्ही तुम्हाला सर्वमावेशक शुल्काधारित फायनान्शियल प्लॅनिंग पुरवितो आणि बहुतेकांच्या गरजा पूर्ण करू शकतील अशी वित्तीय उत्पादने सुचवतो. अनिश्चिततेवर मात करून तुम्ही तुमच्या पैशावर नियंत्रण मिळवून आपली उद्दिष्टे साध्य करण्यासाठी आत्मविश्वासाने पुढे जाण्यास तुम्हाला मदत करणे हे आमचे ध्येय आहे. काम किती गुंतागुंतीचे आहे ह्यावर शुल्क किती असेल ते ठरते.

ध्यानात असू द्या, फायनान्शियल प्लॅनिंग ही छाती दडपून टाकणारी प्रक्रिया असण्याची काही गरज नाही. आमच्याकडे असलेले अर्हताप्राप्त आणि अनुभवी सल्लागार फायनान्शियल प्लॅनिंग ही तुमच्यासाठी एक साधी आणि लाभदायी प्रक्रिया करतील.

**आमची प्रक्रिया :**

१. पहिली भेट आमच्यासाठी आणि तुमच्यासाठी एकमेकांची ओळख होण्याची एक संधी देते. आम्ही तुमच्या सर्व आवश्यकता पूर्ण करण्यास सक्षम आहोत की नाही हे ठरविण्याची एक संधीही तुम्हाला मिळते.

२. तुमची ध्येये आणि उद्दिष्टे तसेच तुमची सध्याची स्थिती स्पष्टपणे समजून घ्या. तुम्हाला तुमच्या संपत्तीने काय साध्य करायचे आहे ह्यावर आपण एक चर्चा करू.

३. चर्चा आणि एक सायकोमेट्रिक चाचणी ह्यांच्या साहाय्याने तुमची जोखीम रूपरेषा निश्चित करा. ह्यामुळे तुम्हाला तुमची ध्येये साध्य करण्यासाठी किती जोखीम घ्यायला हवी आणि किती जोखीम घेणे तुम्ही आवश्यक आहे हे आम्हाला शोधून काढता येईल.

४. तुमची अशी खास वित्तीय योजना म्हणजे फायनान्शियल प्लॅन विकसित करा. ह्यामध्ये तुमच्या गरजेनुरूप शिफारशीनुसार मालमत्ता नियतन आणि गुंतवणूक पर्यायांचा समावेश असेल. हे करताना आम्ही तुमच्या सध्याच्या गुंतवणुकींचेही विश्लेषण करू. आम्ही खास तुमच्या गरजेनुरूप बेतलेल्या फायनान्शियल प्लॅनची अंतिम आवृत्ती सादर करू म्हणजे तुम्ही आगेकूच करण्यास सज्ज असाल.

५. गुंतवणूक प्लॅनची अंमलबजावणी करा. फायनान्शियल प्लॅनमध्ये केलेल्या शिफारशी अंमलात आणण्यासाठी वाईजइन्व्हेस्ट ॲडव्हायझर्सचीच निवड करण्याचे तुमच्यावर बंधन नाही. मात्र तुमची तशी इच्छा असल्यास तुम्ही आमच्या कार्यकारी विभागाच्या सेवेचा लाभ शिफारशी अंमलात आणण्यासाठी घेऊ शकता.

६. तुमच्या परिस्थितीमधील तसेच बाजारांमधील, अर्थव्यवस्थेमधील आणि करांमधील बदल हाताळण्यासाठी आपण नियमितपणे आणि सक्रियपणे भेटू.

**जर तुम्ही वित्तीय नियोजनाची प्रक्रिया सुरू करण्यास उत्सुक असाल तर तुम्ही आमच्या अंधेरी कार्यालयात इन्व्हेस्टमेंट ॲडव्हायझर्सशी संपर्क साधू शकता.**

## वाईजइन्व्हेस्ट ॲडव्हायझर्स प्रायव्हेट लिमिटेड

(CIN No.: U74140MH2003PTC142921)

**मुख्य कार्यालय**

**अंधेरी :** ६०२, सहावा मजला, श्रीकृष्ण कॉम्प्लेक्स, न्यु लिंक रोड, अंधेरी (पश्चिम), मुंबई – ४०० ०५३. टेलिफोन : ६५२८ १५०७ / २६७३२६७६. फॅक्स : २६७३ २६७१.

इ–मेल : information@wiseinvestadvisors.com

**शाखा**

**ठाणे :** ५०२, पाचवा मजला, प्रतीभा बिल्डींग, तीन पेट्रोल पंप जवळ, पाचपाखाडी, ठाणे (पश्चिम) – ४०० ६०२. टेलिफोन : ६५९२ ७०५१ / २५३७ १५६७. फॅक्स : २५३९ १३०६.

इ–मेल : information1@wiseinvestadvisors.com

www.wiseinvestadvisors.com

जाहीर निवेदन : प्रकाशनाच्या वेळी यातील सर्व माहिती चुकीची व खोटी नाही याची खात्री केलेली असून, त्याच्या अचूकतेबद्दल व पूर्णत्वाबद्दल आम्ही कोणतेही प्रतिनिधत्व करत नाही. वाईजइन्व्हेस्ट ॲडव्हायजर्स प्रायव्हेट लिमिटेड ला जबाबदार न धरता सर्व माहिती पुरविण्यात आलेली आहे.

धोके : म्युच्युअल फंड, जसे की सिक्युरिटी इन्व्हेस्टमेन्ट हे शेअर बाजार व इतर धोक्यांवर अवलंबून असतात आणि योजनेची उद्दिष्टे साध्य होतीलच असे खात्रीलायक सांगता येत नाही. सिक्युरिटीजमधील इतर गुंतवणुकीप्रमाणेच युनिटचे एन ए व्हि (NAV) वर किंवा खाली जाऊ शकते व ते कॅपिटल मार्केटवर परिणाम करणाऱ्या घटकांवर व प्रभावांवर अवलंबून असते. कृपया, गुंतवणूक करण्यापूर्वी ऑफर डॉक्युमेन्ट वाचा.

श्री. हेमन्त कुमार रुस्तगी यांनी ६०२, सहावा मजला, श्रीकृष्ण कॉम्प्लेक्स, न्यु लिंक रोड, अंधेरी (पश्चिम), मुंबई ४०००५३ येथून, वाईजइन्व्हेस्ट ॲडव्हायजर्स प्रायव्हेट लिमिटेड यांच्यासाठी संपादित, प्रकाशित केले आहे व ॲडव्हान्टएज ऑफसेट प्रिंटर्स, के–७ रिजवी पार्क, एस. व्ही. रोड, सांताक्रुझ (पश्चिम), मुंबई ४०००५४ येथे छापले आहे.

Edited, Published and Printed by Mr. Hemant Kumar Rustagi, on behalf of **Wiseinvest Advisors Pvt. Ltd.** from 602, 6th Floor, Sri Krishna Complex, Opp. Laxmi Ind. Estate, New Link Road, Andheri West, Mumbai 400053 at **AdvantEdge Offset Printers,** K-7 Rizvi Park, S.V. Rd. , Santacruz (W), Mumbai 400 054**.** Design by **Mosaic Design.** Copyright reserved © 2007. All rights reserved in favour of Wiseinvest Advisors Pvt. Ltd.